# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२६

## ( सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत )

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्री.तुकाराम काते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाचे अध्यक्ष म्हणून माहे एप्रिल, २०१९ ते २०२० या कालावधीत कार्यरत असणारे बेस्ट समिती अध्यक्ष अनिल पाटणकर यांच्या कार्यकाळात बेस्ट मार्फत मुंबई शहरातील वायू प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा अभियानांतर्गत ई-बस खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे, सुरुवातीला २०० दुमजली वातानुकूलित इलेक्ट्रिक बसेस खरेदीसाठी निविदा काढण्यात येऊन नंतर सदर निविदेमध्ये कोणतीही पुनर्निविदा प्रक्रिया न राबविता बसेसची संख्या ४०० व पुढे थेट ९०० पर्यंत वाढविण्यात येणे, परिणामी सदर कंत्राटाची किंमत सुमारे ३ हजार ६०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचणे, तसेच कंत्राट देण्यात आलेल्या कंपनीच्या आर्थिक क्षमतेबाबत व भागभांडवल अत्यल्प असल्याबाबत सार्वजनिक स्तरावर प्रश्न उपस्थित होणे, केंद्र शासनाच्या निधीचा वापर व निविदा प्रक्रियेतील नियमांचे पालन झाले आहे किंवा नाही याबाबत शंका निर्माण होणे, सदर वाढीव कंत्राट प्रक्रियेमुळे पारदर्शकता, स्पर्धात्मकता व प्रशासकीय विश्वासार्हता यावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून वस्तुस्थिती सभागृहासमोर मांडण्याबाबत तसेच नियमभंग आढळल्यास जबाबदार अधिकारी व संबंधित तत्कालीन बेस्ट समिती अध्यक्ष अनिल पाटणकर यांची एसआयटी चौकशी नेमून योग्य ती कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री प्रविण दटके, प्रताप अडसड, मोहन मते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर महानगरपालिका क्षेत्रात मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर गगनचुंबी निवासी व व्यावसायिक इमारतींचे बांधकाम होत असताना अनेक प्रकरणांमध्ये नियमांचे उल्लंघन, पर्यावरणीय हानी, नागरिकांची दिशाभूल व महसूली अनियमितता होत असल्याच्या तक्रारी निदर्शनास येत असणे, आकर्षक जाहिराती,

खोटी आश्वासने, अवास्तव सुविधा व चमकदार प्रचाराच्या माध्यमातून नागरिकांना प्रकल्पांकडे आकर्षित केले जाणे, प्रत्यक्षात जाहिरातीत दाखविलेल्या अनेक सुविधा उपलब्ध होत नसल्याने घर खरेदीदारांची आर्थिक व मानसिक फसवणूक होत असणे, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR), FSI नियम, सेटबॅक, खुल्या जागा, पार्किंग, अग्निसुरक्षा व इतर बांधकाम निकषांचे उल्लंघन होत असणे, सार्वजनिक व मोकळ्या जागांचे संरक्षण, त्यांचा नियोजित वापर आणि नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या सुविधांमध्ये कपात होत असल्याचे आक्षेप नोंदविले जात असणे, भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) व इतर अंतिम परवानग्या देताना मोठमोठ्या विकासकांना नियम डावलून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत असणे, वाढत्या गगनचुंबी इमारतींमुळे पाणीपुरवठा, मलनिःस्सारण, वीजपुरवठा, वाहतूक व्यवस्था, पार्किंग, अग्निसुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांवर अतिरिक्त ताण निर्माण होत असणे, सदर बाबींची दखल घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**(३) श्री.अबू आझमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"महानगरपालिका रुग्णालयामध्ये सिटी स्कॅन आणि एमआरआय (MRI) मशीन नसणे, ज्या रुग्णालयांमध्ये मशीन आहेत त्या नादुरुस्त असणे, मुंबई महानगरपालिकेच्या केईएम (KEM) रुग्णालयाद्वारे रुग्णांना चाचणीसाठी सध्या ३ महिने लांबची तारीख दिली जात असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, केईएममध्ये दररोज सुमारे ६ हजार रुग्ण उपचारासाठी येत असताना रुग्णालयात एमआरआयची केवळ एकच मशीन उपलब्ध असल्यामुळे यंत्रणेवर प्रचंड ताण येत असल्याची बाब निदर्शनास येणे, रुग्णांना केसपेपर आणि नोंदणीसाठी पहाटे ६ वा. पासून रांगेत उभे राहावे लागत असणे, येथे संगणकीकृत प्रक्रिया असूनही तासनतास ताटकळत राहावे लागत असणे, गरीब रुग्णांना खाजगी केंद्रांवर चाचण्या करताना होणारा आर्थिक आणि शारीरिक त्रास लक्षत घेता रुग्णालयासाठी नवीन मशीन्स खरेदी करुन कार्यान्वित करण्याची आवश्यकता, सदर विषयी जनसामान्यांमध्ये शासनाबद्दल असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री.मंगेश कुडाळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"नेहरू नगर, टिळक नगर म्हाडा वसाहती मधील मलनिःस्सारण वाहिनीच्या उन्नती करण्याचे काम महानगरपालिकेने सुरु केलेले असणे, पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्याच्या निविदा मागवण्याआधी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ व १२ मे, २०२६ रोजी संयुक्त बैठक घेण्यात आली असणे, सदर बैठकीत म्हाडाचे संबंधित अधिकारी उपस्थित असणे, बैठकीदरम्यान म्हाडा प्राधिकरणाकडून महानगरपालिकेला मलनिःस्सारण वाहिनीच्या नूतनीकरणाकरिता ५०% रक्कम देण्यात यावी असा

निर्णय देण्यात आलेला असणे, महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ रोजी अर्ध शासकीय पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हाडा यांना याबाबत कळविण्यात येणे, म्हाडा प्राधिकरणाकडून ५० टक्के रक्कम प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेकडून उपरोक्त नमूद म्हाडा वसाहतीतील मलनि:स्सारण वाहिनी उन्नत करण्याकरीता निविदा मागवून कामे हाती घेण्याचे निर्णय घेण्यात येणे, अद्याप म्हाडा प्राधिकरणाकडून कोणताही निर्णय न झाल्याने सदरचे काम अपूर्ण असणे, याबाबत नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) सर्वश्री राजेंद्र गावित, संजय गायकवाड, अमोल खताळ, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पालघर जिल्ह्यातील सातपाटी-मुरबे व नवापूर खवाडी परिसरातील सागरी पर्यावरणावर तारापूर एमआयडीसीमधून सोडण्यात येणाऱ्या प्रक्रिया न केलेल्या अथवा अपुऱ्या प्रक्रियेनंतर सोडल्या जाणाऱ्या औद्योगिक रासायनिक सांडपाण्याचा गंभीर परिणाम होत असणे, सदर परिसर हा महाराष्ट्राचा राज्य मासा म्हणून घोषित करण्यात आलेल्या पापलेटसह विविध व्यावसायिक मत्स्यप्रजातींचे महत्त्वाचे प्रजनन क्षेत्र असणे, तसेच हजारो पारंपारिक मच्छीमार व आदिवासी बांधवांची उपजीविका शिंपले, कालवे व मासेमारीवर अवलंबून असणे, असे असूनही सातत्याने होणाऱ्या प्रदूषणामुळे मत्स्य उत्पादनात घट, सागरी जैवविविधतेचे नुकसान, मच्छीमारांच्या उपजीविकेवर परिणाम तसेच स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनणे, या प्रकरणी सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इन्स्टिट्यूट (CMFRI) मार्फत शास्त्रीय अभ्यास करून प्रदूषणाचा मत्स्यसंपत्तीवरील परिणाम निश्चित करणे, जबाबदार उद्योगांवर कठोर कारवाई करणे व सागरी परिसंस्थेच्या संवर्धनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(६) डॉ.राहूल पाटील, सर्वश्री रत्नाकर गुट्टे, राजेश विटेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गेल्यावर्षी परभणी जिल्ह्यात अचानक अतिवृष्टी होणे, सदर अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतक-यांच्या शेतीचे अतोनात नुकसान होणे, नुकसान भरपाईसाठी राज्य शासनाने शेतक-यांना अतिवृष्टीमुळे भिजलेल्या पिकांचे वजन तसेच भिजलेले पीक वाळल्यानंतर वजन सादर करावे असे आदेश देणे, त्यानुसार परभणी जिल्ह्यातील शेतपिकांची ओले व सुके अशी दोन्ही वजने कृषी विमा कंपनीकडे सादर करणे, दोन वेगळ्या गटात (ओले व सुके) वजन करुन नुकसानीचे प्रमाण ठरवण्यासाठी शासनाने काढलेल्या आदेशाची विमा कंपनीला माहिती देण्यात आलेली नसणे, त्यामुळे विमा कंपनीकडून ही बाब कंपनीच्या निकषात बसत नसल्याचे कारण देत शेतक-यांची नुकसान भरपाईची विनंती अमान्य करुन विम्याची रक्कम न देणे, जिल्हा कृषी अधिक्षक, परभणी यांनी शासनाच्या आदेशाची

माहिती विमा कंपनीला दिलेली नसल्याचे मान्य करणे, याबाबत कंपनीला त्वरीत शासनाच्या आदेशाबाबत माहिती देऊन लवकरात लवकर नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाईची रक्कम मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात येणे, तथापि अद्याप नुकसान भरपाई न मिळणे, परिणामी शेतक-यांमध्ये असंतोष पसरणे, यासंदर्भात शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शासनाने अनुकूल निर्णय घेण्याची आवश्यकता, शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, संजय देरकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात जिल्हापरिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांची मोठया प्रमाणावर पदे रिक्त असणे, त्यामुळे जिल्हापरिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांच्या शिक्षणाच्या दर्जावर परिणाम होत असणे, मात्र रिक्त पदांवर नव्याने नियुक्ती न झाल्यामुळे रिक्त पदांचा अनुशेष तसाच पुढे चालू राहणे, जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षणाची आबाळ होत असल्याचे कारण पुढे करून जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची सतत होणारी गळती, या पार्श्वभूमीवर विधानसभा सभागृहात प्रश्नोत्तराच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार दिनांक १२.१२.२०२५ रोजी विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता, छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील परभणी, बीड, धाराशिव व जालना या चार जिल्हयात मिळून सुमारे ४६६ शिक्षक अतिरीक्त असल्याची बाब निदर्शनास येणे, या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील रिक्त पदे असणाऱ्या अन्य जिल्हयांमध्ये या अतिरीक्त शिक्षकांना सामावून घेतल्यास रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळता येऊ शकेल, या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**(८) श्री.राजेश वानखडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील तिवसा विधानसभा मतदार क्षेत्रातील जास्त लोकसंख्या असलेले व मोठ्या संख्येने लगतची लहान गावातील नागरिक आरोग्य सुविधेकरीता अवलंबून असलेले माहुली जहागीर, वलगाव (ता.अमरावती), नेर पिंगळाई (ता.मोर्शी), कुऱ्हा (ता.तिवसा) व खोलापूर (ता.भातकुली) या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्ण संख्या जास्त व आरोग्य सेवा अपुरी पडणे, त्यामुळे नागरिकांना नाईलाजाने उपचाराकरिता तालुक्याच्या ठिकाणी जावे लागणे, तेथे चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा पुरवण्याकरिता या आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत सातत्याने नागरिकांद्वारे मागणी असणे, सदर आरोग्य केंद्रांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत लोकप्रतिनिधींद्वारे मागणी पत्रान्वये मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे केलेली असणे, सदर प्रस्ताव उपसंचालक कार्यालय अकोलाद्वारे शासनास अनेक महिन्यांपासून सादर करण्यात आलेला असणे, या प्रस्तावावर अद्यापही मान्यतेची कार्यवाही न होणे, त्यामुळे रुग्णांना अनावश्यक त्रास

होऊन जनतेमध्ये शासनाप्रती रोष निर्माण होणे, या प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये तातडीने श्रेणीवर्धन करण्याची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री समीर कुणावार, धनंजय मुंडे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री अभिमन्यु पवार, संजय केळकर, किसन कथोरे, योगेश सागर, अनिल पाटील, मंगेश चव्हाण, देवराव भोंगळे, राजेश बकाने, करण देवतळे, सत्यजित देशमुख, डॉ.आशिषराव देशमुख, सर्वश्री सुनिल प्रभू, सुधीर मुनगंटीवार, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.रोहित पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात शासनामार्फत सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध आरोग्य योजना राबविण्यात येत असणे, विशेषतः महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत योजना अंतर्गत गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांना मोफत अथवा सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून देण्याचा शासनाचा उद्देश असणे, परंतु प्रत्यक्षात अनेक खाजगी रुग्णालयांकडून या योजनांचा लाभ रुग्णांना देण्यास टाळाटाळ केली जात असणे, काही रुग्णालयांमध्ये योजनेंतर्गत बेड उपलब्ध नसल्याचे सांगितले जाणे, तर काही ठिकाणी तांत्रिक कारणे पुढे करून रुग्णांकडून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम घेतली जात असणे, त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून शासनाच्या योजनांचा मूळ उद्देशच अपूर्ण राहत असणे, विशेष म्हणजे अनेक रुग्णालये शासनाच्या मान्यताप्राप्त यादीत असूनही प्रत्यक्ष लाभ देण्यास नकार देत असणे, याबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत असून त्यामुळे शासनाने अशा रुग्णालयांची तपासणी करून दोषी आढळणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करणे अत्यंत आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **डॉ.किरण लहामटे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे राजूर, ता.अकोले, जि.अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयास शासनाकडून मंजूरी देण्यात आलेली असणे, सदर उपजिल्हा रुग्णालयामुळे अकोले तालुक्यातील राजूर येथे अप्पर तहसिल शासनाने मंजूर केले असून सदर राजूर हे भौगोलिकदृष्टया तसेच परिसरात आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार व तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असणे, राजूर परिसर हा मोठया लोकसंख्येचा तसेच दुर्गम भागाशी जोडलेला असल्यामुळे नागरिकांना गंभीर व तातडीच्या वैद्यकीय उपचारांसाठी दूरवर जावे लागणे, त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयाची स्वतंत्र व सुसज्ज इमारत तातडीने उभारणे गरजेचे असणे, सदर रुग्णालयाच्या बांधकामामुळे परिसरातील नागरिकांना वेळेवर, प्रभावी व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्याची आवश्यकता, तसेच काही महिन्यांआधी राजूर येथे काविळची मोठया प्रमाणात साथ

येणे, त्यावेळेस नागरिकांना आरोग्य उपाचारांची मोठी समस्या निर्माण झालेली असणे, परिणामी मौजे राजूर, ता.अकोले, जि.अहिल्यानगर येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामास सार्वजनिक आरोग्य विभागाने प्राधान्यक्रमाने प्रशासकीय मान्यता देऊन त्यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे**.

**पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** : "ठाणे जिल्हयात पाण्याची करण्यात आलेली कपात" श्री.रुपेश म्हात्रे, वि.स.स यांच्या दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३५५१ ला अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(क) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४४ ते ४६ सभागृहाच्या पटलावर ठेवणे**.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : **(क)** महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** सहाव्या महाराष्ट्र वित्त आयोगाचा अहवाल व स्पष्टीकरणात्मक ज्ञापन सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** शासनाच्या नगरविकास विभाग, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागांतर्गत दिनांक ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधीत प्रशासकीय नियंत्रणाखालील संस्था/उपक्रमांना देण्यात आलेली कर्जे, कर्जरोखे, Letter of Comfort व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या थकहमी विषयीचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(घ)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) "सन २०२४-२०२५ या वर्षाचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल" (२) "मार्च, २०२४ रोजी संपलेल्या कालावधीसाठी जल जीवन अभियानावरील निष्पादन लेखापरीक्षा अहवाल" (३) "मार्च, २०२४ रोजी संपलेल्या कालावधीचा अहवाल" व (४) "३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) संसदीय कार्य मंत्री** : तारांकित प्रश्न क्रमांक ३८२८१ च्या अनुपूरक प्रश्नोत्तरांच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवताना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार, एकूण आश्वासनांची वस्तुस्थिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(३) सांस्कृतिक कार्य मंत्री** : कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) कृषी मंत्री** : महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९ कलम २२ चे पोट कलम (१) सह कलम ७ चे पोट कलम (१) मधील तरतुदीनुसार, "महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२६ दि.०७/०७/२०२६ सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती मिळाल्याचे जाहीर करणे.**

**चार : मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव -**

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) श्री.जयकुमार गोरे, मा.ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी श्री.रोहित पवार, वि.स.स. यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(२) श्री.जयकुमार गोरे, मा.ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी "लय भारी" युटयुब वाहिनीचे संपादक / चालक श्री.तात्यासो ऊर्फ तुषार आबाजी खरात यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(३) श्री.सुरेश धस, वि.स.स. यांनी डॉ. मंगेश गोंदवले, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेविरुध्द दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(४) श्री.नारायण पाटील, वि.स.स. यांनी श्रीमती शिल्पा ठोकडे, तहसीलदार, करमाळा यांचेविरुध्द दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(५) डॉ.ज्योती गायकवाड, वि.स.स. यांनी श्री. विनायक विसपुते, सहायक आयुक्त, जी नॉर्थ, बृहन्मंबई महानगरपालिका, मुंबई यांचेविरुध्द दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(६) श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांनी श्री.राजेश कुमार जयस्वाल, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड महारेल (MRIDC) यांचेविरुध्द दिनांक १७ डिसेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(७) श्री.अर्जुन खोतकर वि.स.स. यांनी आयुक्त, जालना महानगरपालिका यांचेविरुध्द दिनांक २४ मार्च २०२६ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

या सात प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**सहा : (अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री राहुल आवाडे, संग्राम जगताप, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात वारंवार महापुरुषांचे स्मारक, प्रतिमा, बॅनर्स इत्यादींची समाजकंटकाकडून जाणीवपूर्वक विटंबना करण्यात येणे, कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या ६ महिन्यांत महाराष्ट्राचे आराध्य दैवत ‘छत्रपती शिवाजी महाराज’ आणि ‘धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज’ यांच्या प्रतिमा व बॅनर्सची विटंबना केल्याच्या अनेक घटना घडणे, कुंभोज (ता.हातकणंगले) येथील नियोजित शिवस्मारकाच्या जागेवर लावण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे पोस्टर झाकीर मुजावर व इनाम मुजावर यांनी फाडून टाकणे, सदर प्रकरणी हातकणंगले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होणे,तसेच करनूर (ता.कागल) येथे दिनांक १२/०३/२०२६ रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान मासानिमित्त व्हॉट्सअॅप ग्रुपवर श्लोक शेअर केल्याने तौफिक शेख व इतर ६०-७० जणांच्या जमावाने हिंदू तरुणांना बेदम मारहाण व दगडफेक करणे, यामध्ये अनेक तरुण गंभीर जखमी होणे, सदर प्रकरणी कागल

पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे, तसेच कबनूर (ता.इचलकरंजी) येथील हिंदित्व चौकात बलिदान मास सुरु असतांना एका महिलेकडून छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बद्दल अत्यंत अश्लील भाषेचा वापर करुन शांतता भंग करण्याचा प्रयत्न करण्यात येणे, सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे गुन्हा नोंदविण्यात येणे, राज्यात वारंवार महापुरुषांची विटंबना करणा-या समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्यासाठी तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता असे गुन्हे अजामीनपात्र ठरण्यासाठी “महापुरुष विटंबना विरोधी कायदा” अंमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री.राजेश क्षिरसागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील महत्त्वाच्या शहरांपैकी एक असलेल्या कोल्हापूर शहर व जिल्ह्यात गंभीर गुन्ह्यांचा वाढता आलेख, वाढती लोकसंख्या आणि पोलीस दलावरील वाढता ताण लक्षात घेता कोल्हापूर येथे स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत असणे, सन १९८५ पासून पोलीस आयुक्तालयाचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असून तो लालफितीत अडकून पडल्याची भावना जनतेमध्ये असणे, कोल्हापूर हे पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख व्यापारी, शैक्षणिक, औद्योगिक व धार्मिक केंद्र म्हणून विकसित झाले असणे, वाढत्या औद्योगिकीकरणामुळे तसेच विविध राज्यांतील कामगारांच्या स्थलांतरामुळे लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असणे, यासोबतच संघटीत गुन्हेगारी टोळ्यांचे वाढते जाळे, खून, खुनाचा प्रयत्न, घरफोडी, चोरी, लूटमारी, खंडणी व इतर गंभीर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास येणे, लोकसंख्येच्या तुलनेत पोलीस दलातील मनुष्यबळ अपुरे असल्याने गुन्हे प्रतिबंध, तपास, वाहतूक व्यवस्थापन आणि कायदा-सुव्यवस्था राखणे ही मोठी आव्हाने निर्माण झाली असणे, शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने जनतेमध्ये राज्य शासनाप्रती तीव्र असंतोष व नाराजीची भावना असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री संजय उपाध्याय, अमित साटम, तुकाराम काते, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील पात्र फेरीवाल्यांना क्यूआर कोड देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत प्रश्न निर्माण झालेला असणे, शासनाने क्यूआर कोड देण्यापूर्वी संबंधित फेरीवाल्यांची पात्रता, ओळख, वास्तव्यासंबंधी माहिती, व्यवसायाची नोंद व टाउन वेंडिंग कमिटीमार्फत (TVC) काटेकोर पडताळणी करण्याची प्रक्रिया स्पष्ट करण्याची आवश्यकता, प्रत्येक क्यूआर कोड हा संबंधित व्यक्तीचा फोटो, ओळखपत्र व बायोमेट्रिक पडताळणीशी जोडून त्याचे हस्तांतरण किंवा गैरवापर रोखण्यासाठी सक्षम डिजिटल यंत्रणा

उभारावी, एका क्यूआर कोडवर अनेक व्यक्ती व्यवसाय करत असल्यास क्यूआर कोड तत्काळ रद्द करून दंडात्मक व फौजदारी कारवाईची तरतूद करावी, पात्र फेरीवाल्यांची अधिकृत यादी सार्वजनिक करावी, तसेच क्यूआर कोड वाटप पूर्ण झाल्यानंतर अपात्र व बेकायदेशीर फेरीवाल्यांवरील कारवाईचे निश्चित वेळापत्रक जाहीर करून संपूर्ण मुंबईत विशेष मोहीम राबवावी, नो-हॉकिंग झोन, पदपथ, रुग्णालये, शाळा, रेल्वे स्थानके व प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण हटवून पात्र फेरीवाल्यांचे हक्क आणि नागरिकांचा सार्वजनिक जागांवरील हक्क यांचा समतोल राखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भंडारा जिल्ह्यातील भंडारा, साकोली व तुमसर उपविभागातील अनेक वाळू घाटांवर मंजूर क्षमतेपेक्षा जादा उत्खनन, मंजूर क्षेत्राबाहेर रेती उपसा, तसेच शासनाच्या वाळू/रेती निर्गती धोरण-२००५ चे उल्लंघन झाल्याची बाब निदर्शनास येणे, अनेक घाटांवर Illegal Location, Out of Location, Over Excavated अशा नोंदी असूनही रॉयल्टीची नोंद झाल्याने मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा संशय निर्माण होणे, शासनाने हातभरतीस परवानगी दिलेली असताना काही ठिकाणी यांत्रिक साधनांचा वापर करून उत्खनन व भरती करण्यात येणे, तसेच ट्रॅक्टर किंवा सहा चाकी वाहनांऐवजी दहा व बारा चाकी ट्रकद्वारे नदीपात्रातून रेती वाहतूक झाल्याचेही निदर्शनास आले असणे, या प्रकारामुळे शासनाच्या महसूलाबरोबरच पर्यावरणाचेही मोठे नुकसान होणे, त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची एसआयटी किंवा उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर फौजदारीसह विभागीय कारवाई करुन शासनाचा महसूल वसूल करावा तसेच संबंधित कंत्राटदारांना भविष्यातील वाळू लिलाव व निविदा प्रक्रियेतून काळ्या यादीत (Black List) टाकण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) सर्वश्री. उत्तमराव जानकर, विक्रम पाचपुते, डॉ. राहूल आहेर, सर्वश्री बबनराव यादव (लोणीकर), सुधीर मुनगंटीवार, नारायण कुचे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री समाधान आवताडे, रोहित पवार, नानाभाऊ पटोले, ॲड. राहूल कुल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पंढरपूर तालुक्यातील 'बावचे' कुटुंब आणि त्यांचे नातेवाईक हे एका वाहनातून म्हसवड येथील सिद्धनाथ मंदिरात देवदर्शनासाठी गेले असणे, परतीच्या प्रवासात जि.सोलापूर, ता.माळशिरस तांदूळवाडी गावाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून १४ ते १५ प्रवाशांनी भरलेले वाहन थेट रस्त्यालगतच्या पाण्याने भरलेल्या विहिरीत कोसळून या दुर्घटनेत महिला व लहान मुलांसह ८ निष्पाप जणांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला असणे, ही केवळ एक दुर्घटना नसून संबंधित कंत्राटदार नवज्योत गडोख,रोडवेज कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे व MSRDC चे संबंधित अधिकारी यात दोषी असणे, रुंदीकरणामुळे ही विहीर रस्त्याच्या अगदी लगत असून रस्त्याची उंची

वाढवली जाणे, प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विहिरीला कोणतीही मजबूत संरक्षक भिंत किंवा बॅरिकेट्स बसविण्यात आले नसणे, रस्त्याचे काम निकृष्ट आणि अपूर्ण असतानाही प्रवाशांच्या सुरक्षेची कोणतीही पडताळणी न करता कंत्राटदारांची देयके मंजूर करून कामे पूर्ण झाल्याचा दाखला दिला असणे,हा सरळ MSRDC चे संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांचा अक्षम्य हलगर्जीपणा असणे, वेळापूर पोलिसांनी याप्रकरणी रस्ते विकास महामंडळाचे संबंधित अधिकारी, रस्त्याची देखरेख करणारे अभियंते आणि कंत्राटदार, कंपनीचे मुख्य मालक नवज्योत गडोख यांच्यावर तातडीने सदोष मनुष्यवधाचा BNS अंतर्गत गुन्हा दाखल करून अपूर्ण व असुरक्षित कामाची पडताळणी न करता ज्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराची देयके अदा केली त्यांना तात्काळ निलंबित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(म.वि.स. नियम १०५ अन्वये सभागृहात चर्चेकरिता न आलेल्या लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.)

**सात : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - श्री राम मंदिर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (रामटेक) विधेयक, २०२६

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - श्री राम मंदिर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (रामटेक) विधेयक, २०२६**

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्यास विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६**

---

**(२) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

---

**(३) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६**

**आठ : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**(गुरुवार, दिनांक ९ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री रोहित पवार, अजय चौधरी, अमिन पटेल, उत्तमराव जानकर, दिलीप सोपल, अमित देशमुख, संदिप क्षीरसागर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री नारायण पाटील, सुनील राऊत, अमित झनक, अभिजीत पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, राजू खरे, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. बाबासाहेब देशमुख, श्री. हारुन खान, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री महेश सावंत, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, हेमंत ओगले, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दुर्देवी निधन होणे, सदरील अपघाताबाबत जनतेच्या मनात साशंकता असून या अपघाताची सर्वंकष व सखोल चौकशी होण्याची होत असलेली मागणी, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर होत असलेला प्रश्न, अपराध रोखण्यात तसेच गुन्ह्याचे अन्वेषण करण्यात गृह विभागाला आलेले अपयश, विरोधी पक्षातील नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे वाढलेले प्रमाण, केंद्रीय गृहमंत्री यांच्याविरुद्ध दिलेल्या घोषणांमुळे करण्यात आलेल्या तडपारीवर सुनावणी दरम्यान पोलिसांच्या कार्यपद्धतीवर मा.उच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे, भंडारा येथे नरेश ईश्वरपूरकर या महाविकास आघाडीच्या भंडारा विधानपरिषद उमेदवाराच्या घरावर निवडणूक कालावधीत १५० पोलिसांसह भंडारा पोलिस अधीक्षक यांनी खोट्या गुन्ह्याच्या अनुषंगाने केलेली बेकायदेशीर कारवाई, सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीत पालकमंत्री व राज्याच्या मंत्र्यांना पोलिसांनी केलेली मारहाण, एकंदरीतच राज्याचा पोलिसांचा उद्दामपणा व दमनकारी वर्तणूक यामध्ये झालेली वाढ, मा.सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरुद्ध बिहार शासन या केसमध्ये दिलेल्या निकालाचे अवमान करणारे पोलिसांचे वर्तन, त्यास तात्काळ पायबंद घालण्याची आवश्यकता, महिला व लहान बालिकांवर होत असलेला अत्याचार व हत्येच्या घटनांमध्ये झालेली वाढ, राज्यात महिला व मुली बेपत्ता होण्याचे वाढलेले प्रमाण, ठाणे जिल्ह्यातील नेतीवली नाका परिसरात एका ७ वर्षीय चिमुरडीवर झालेला सामुहीक अत्याचार, जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथे एका आदिवासी महिलेवर करण्यात आलेला सामुहीक बलात्कार, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात एका अल्पवयीन मुलीवर करण्यात आलेला सामुहिक बलात्कार, त्यामध्ये राजकीय नेत्यांचा असलेला समावेश,

सांगली शहर परिसरात झालेल्या गोळीबारात वेदांत बंडगर या बालकाचा झालेला खून, बीड जिल्ह्यातील नुकतेच घडलेले खुनाचे प्रकार यासारख्या घटनांमुळे राज्यातील जनतेमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण,ठाणे पोलिस आयुक्तालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या ६ ते ७ वर्षे न झालेल्या बदल्या, वादग्रस्त पोलिस अधिकारी यांची महत्वाच्या ठिकाणी होत असलेली नियुक्ती,पोलिसांच्या बदल्यांमध्ये होत असलेले मोठे आर्थिक गैरव्यवहार, राज्यात ड्रग व इतर अंमली पदार्थांची होत असलेली सर्रास विक्री, यामुळे लहान मुलांमध्ये अंमली पदार्थ सेवनाचे वाढलेले प्रमाण, मुंबई लोकलमध्ये किरकोळ वादातून झालेल्या हत्या, राज्याची उपराजधानी असलेले नागपूर हे गुन्हेगारीचे शहर बनत असणे, एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्याने एचडीएफसी बँकेच्या अधिकाऱ्यांबरोबर संगनमत करुन व रस्ते सुरक्षा मोहिम अनधिकृतपणे राबवून ४५ कोटी रुपयांचे निधीची अफरातफर केल्याप्रकरणी एसआयटी स्थापन करण्याची आवश्यकता, मुंबईच्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात झालेल्या ५० कोटी रुपये नुकसानीबाबत व गैरव्यवहाराबाबत पोलिस चौकशी (एसआयटी) करण्याची आवश्यकता, ठाणे येथील रतनशी प्रेमजी ट्रस्टमध्ये पुन्हा घोटाळा झाल्याचे उघडकीस आल्याने या प्रकरणाची पोलिसांकडून गुन्हा दाखल करुन चौकशी करण्याची आवश्यकता, राज्यात अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाची खते आणि बोगस बि-बियाणे शेतक-यांना विकल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द पोलिसांकडे तक्रारी करुनही कारवाई न होणे, राज्यात विविध ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने घातलेल्या धाडींच्या अनुषंगाने पोलिसांकडून करण्यात येत असलेली कार्यवाही, विकासाच्या नावाखाली झालेले काँक्रीटीकरण आणि त्यातील भ्रष्टाचार यामुळे पायाभूत सुविधांची झालेली दुर्दशा, मुंबई, पुणे व अन्य महानगरपालिकेत मोठया प्रमाणात होत असलेला टीडीआरचा घोटाळा, अनेक महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदेमध्ये घनकचरा व्यवस्थापन करताना होत असलेला गैरव्यवहार, राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दरवर्षी रस्ते, पूल, शासकीय इमारती आणि इतर पायाभूत सुविधांवर अनेक ठिकाणी झालेली निकृष्ट दर्जाची कामे, अनियमितता आणि भ्रष्टाचार होत असणे, अनेक रस्ते काही महिन्यांतच उखडणे, मोठमोठे खड्डे पडणे, पुलांमध्ये तडे जाणे किंवा पावसाळ्यात रस्ते वाहून जाणे यामुळे कामांच्या गुणवत्तेवर गंभीर शंका निर्माण होणे,विशेषतः गडचिरोली, चंद्रपूरसह विदर्भ संपूर्ण राज्यातील रस्त्यांची दुरवस्था ही नागरिकांसाठी मोठी समस्या बनली असून दुर्गम आणि आदिवासीबहुल भाग असल्याने रुग्णवाहिका, शालेय वाहने, शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणे, शासनाने जाहीर केलेली "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना", या योजनेमध्ये सन २०१९ च्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ रु.५० हजारपर्यन्त कर्जमाफी देण्याची अट असणे, तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२५-२६ व २०२६-२७ मधील पीककर्ज नियमित भरलेले असण्याची अट असणे, परिणामी लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**नऊ : अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) **श्री.राजन नाईक, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

(२) **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५७ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (सुधारणा) विधेयक, २०२६

(३) **श्री.कैलास घाडगे-पाटील, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८ - महाराष्ट्र कार्यस्थळी वैद्यकीय भेदभाव (प्रतिबंध, मनाई व निवारण) विधेयक, २०२६

(४) **श्री.कैलास घाडगे-पाटील, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ - महाराष्ट्र राज्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सोयी सुविधा देण्यासाठी विधेयक, २०२६

**(ब) विचारार्थ :-**

**(शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले तथापि, चर्चा न झालेले अशासकीय विधेयके क्रमांक १ ते ३)**

(१) **श्री. अबू आजमी, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८३ - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, धर्मगुरु व धर्मग्रंथ, धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध विधेयक, २०२५

(२) **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

(३) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९१ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२५

**दहा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४१**

"राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू देशी खेळांमध्ये मोठ्या

प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २९**

"पुणे शहरातील मुळा-मुठा नद्या आणि इतर जलस्रोत गंभीर प्रदूषित असणे, अपुरी सांडपाणी प्रक्रिया क्षमता, अनधिकृत बांधकामांमुळे नद्यांमध्ये सांडपाणी मिसळणे, पाणीपुरवठयाचे असमान वितरण (काही भागात ६०० लिटर तर काहीत १०० लिटर प्रति व्यक्ती), खडकवासला आणि इतर धरणांमधील प्रदूषण वाढणे, यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता धोक्यात येणे आणि आरोग्य समस्या निर्माण होणे, नद्यांचे पुनरुज्जीवन आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना (जसे **JICA**) गती देणे आवश्यक असणे, तरी शासनाने पुणे शहर आणि जिल्ह्यातील नदी प्रदूषण रोखण्यासाठी आणि पाणीपुरवठा समान व न्यायपूर्ण करण्यासाठी तातडीने कालबद्ध योजना राबवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ८९**

"राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमीपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना) (क्रमांक ४ ते ६)**

**(४) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५७**

"राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपावाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(५) श्री. राजेश बकाने, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४९**

"राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करित असलेल्या हजारो

विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(६) श्री. साजिद खान पठाण, वि.स.स. यांचा ठराव क्र. ७८**

"राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासह बहुसंख्य शहरांची लोकसंख्या मोठयाप्रमाणात वाढत असणे, या शहरांच्या विविध भागात दरवर्षी वाढत असलेले कचऱ्याचे ढीग, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची महानगरपालिकांकडील यंत्रणा अपूरी व कालबाहय झालेली असणे, शहरातील साठणाऱ्या या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महानगरपालिकांना येत असलेले अपयश, कचऱ्यांच्या ढीगांमुळे अनेक भागात रोगराई पसरुन नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, दुर्गंधी पसरल्यामुळे रस्त्यावरुन नागरीकांना जाणे-येणे मुश्किल होणे, महानगरपालिकांनी यावर परिणामकारक उपाययोजना आखण्याची आवश्यकता असतानाही त्यांचेकडून तशी कार्यवाही न होणे, नागरीकांच्या आरोग्यांशी हा प्रश्न निगडीत असल्यामुळे शासनस्तरावरुन यात लक्ष घालण्याची आवश्यकता, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी परिणामकारक व कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावेत, असे आदेश सर्व महानगरपालिकांना शासनाने द्यावेत, त्यानुसार परिणामकारक अंमलबजावणी होते किंवा कसे याचा आढावा घेण्यासाठी शासनस्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधासभा शासनास करीत आहे."

**(७) श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८०**

"संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जन माणसात रुजवण्याचे कार्य करणारे समाजसुधारक, लोककवी, लेखक, शाहीर, कथा-कादंबरीकार, दलित साहित्याचे संस्थापक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे (तुकाराम भाऊराव साठे) यांना मरणोत्तर 'भारतरत्न' प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

# "राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ जुलै, २०२६

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा